F:\Palwe-9\Grievance\Letter-4.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
संगणकीकृत नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुके/३/कावि/३२ /२०१३
दिनांक :- २० /५/२०१३

**विषय :- तक्रार निवारण संगणक प्रणालीमधील तक्रारींची मुदत कमी करून त्यानुसार गुणांक निश्चितीबाबत.....**

संदर्भ :- क्र.नासुके/१/कावि/७८२/२०१२ दिनांक - २६/१२/२०१२

परिपत्रक,

नागरिकांच्या विविध माध्यमांद्वारे तक्रारी नागरी सुविधा केंद्रामध्ये प्राप्त होत असतात. त्या सर्व तक्रारींची संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन पुर्तता करणे व नागरिकास कळविणे क्रमप्राप्त आहे, मात्र असे असतानाही अनेक तक्रारी ह्या एका ४५ दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित रहात असल्याचे वेळोवेळी विभागप्रमुखांच्या बैठकीमध्ये निदर्शनास आले आहे. त्यामुळे तक्रार निवारण संगणक प्रणालीमध्ये प्रलंबित तक्रारींकरिता सद्यस्थितीत निश्चित केलेला कालावधी कमी करणेत येत असून त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करणेत येत आहे.

| अ.क्र. | यापुर्वीचा कालावधी | सुधारित कालावधी | गुणांक संख्या |
|---|---|---|---|
| १ | १ ते ७ दिवस | १ ते ७ दिवस | ० |
| २ | ७ ते १५ दिवस | ७ ते १५ दिवस | १ |
| ३ | १५ ते ३० दिवस | १५ ते २१ दिवस | २ |
| ४ | ३० ते ४५ दिवस | २१ ते ३० दिवस | ५ |
| ५ | ४५ दिवसांपेक्षा जास्त | ३० दिवसांपेक्षा जास्त | १० |
| ६ | चुकीचे / दिशाभूल उत्तर दिले असल्यास | | १० |

यापुढे उपरोक्त प्रमाणे कार्यालयीन कामकाजांचे दिवस विचारात घेऊन प्रलंबित तक्रारींना गुणांक निश्चित केले जाणार असून यापुर्वी निश्चित केलेल्या विभागांचे गुणांकानुसार संबंधित विभागप्रमुखांवर होणा-या कारवाईमध्ये बदल करणेत आलेला नाही. तरी संबंधित विभागप्रमुखांनी सद्यस्थितीत निश्चित केलेल्या कालावधीनुसार तक्रारींची पुर्तता करावी. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा / निष्काळजीपणा अपेक्षित नाही.

**(डॉ. श्रीकर परदेशी)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११०१८**

प्रत :- संगणक विभाग
२/- संगणक प्रणालीमध्ये सुधारित कालावधीनुसार गुणांकात बदल करणेकामी